# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensational Crime**

**Police Station** :- **Local crime Branch, Washim**

**Date of Good Work done** :- **03/12/2022**

**Brief of the work done :-**

महिलेवर प्राणघातक चाकूहल्ला प्रकरणातील मुख्य आरोपी अटकेत.

नवराष्ट्र

दणका • जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनात कारवाई

## रंजना पौळकर हल्ल्यातील मुख्य आरोपीला अटक

**वाशीम**, ब्युरो. वाशिम जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनात वाशिम जिल्हा पोलिसांनी रंजना पौळकर हल्ल्यातील मुख्य आरोपीला बिहारमधून अटक करून तपास पूर्ण केला. रंजना पौळकर या महिलेवर 10 नोव्हेंबरला प्राणघातक हल्ला झाला. त्यामध्ये फरार असलेला मुख्य आरोपी अटल काशीनाथ यादव याला बिहार येथून अटक करण्यात आली.

ही घटना पाटणी चौक ते अकोला नाका ग्रामीण पास्टेसमोरून रंजना पौळकर ह्या आपल्या काही मैत्रणीसोबत रस्त्याने जात असतांना त्यांना एका अज्ञात इसमाने चाकुचे वार करुन जिवाने मारण्याचा प्रयत्न केला मात्र सोबतच्या महिलांना आरडाओरड केल्याने आरोपी फरार झाला होता.

या हल्लयाबाबत वाशिम शहर पोस्टेला गुन्हा दाखल करण्यात आला या प्रकरणाचा तपास वाशिम पोस्टेचे डीबी पथक यांना दिला होता. मात्र नंतर त्यांतनर स्थागुशाखेकडे हा तपास वर्ग केला स्थागुशाखेच्या पथकाने येथील सौदागर पुरा येथील अब्दुल वाजीद उर्फ गोर्या अब्दुल सय्यद याला ताब्यात घेऊन सखोल विचारपुस केली. त्यामध्ये अब्दुल जुबैर अब्दुल जब्बार गड्डीपुरा वाशिम. व शेख नुर रशीद याला संशयीत म्हणून ताब्यात घेतले. पोलिसांनी आपल्या खाक्या दाखवताच त्यांनी अब्दुल वाजीद उर्फ गोऱ्याच्या माध्यमातून अटलकुमार काशीनाथसिंह यादव रा. दावत विक्रमंगज पोस्टे सुर्यपुर जिल्हा रोहतास बिहार याला 25 हजार रुपये देऊन सदर महीलेवर प्राणघातक हल्ला केला. असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली. सदर यादव व अब्दुल वाजीद हे वाशिम येथे कामानिमित्त वास्तव्यास होते. तपास दरम्यान आतापर्यंत सहा आरोपीला अटक करण्यात आली.

यामध्ये अब्दुल वाजीद उर्फ गोर्या, अब्दुल जुबेर अब्दुल जब्बार, भगवान वाकुडकर, नितीन कावरखे, सुरेश मापारी, शेख नुर उर्फ शहानुर, यांच्यावर अटक कारवाई केली त्यांना विद्यमान न्यायालया समोर हजर केले असता त्यांना न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असल्याची माहीती. उपविभागीय पोलिस अधिकारी तथा तपास अधिकारी सुनिलकुमार पुजारी, स्थागुशाखे एस.एम. जाधव, वाशिम पोस्टेचे निरीक्षक शेख रफीक यांनी संयुक्त पत्रकार परिषदेमधून माहिती दिली.

सदर या प्रकरणातील मुख्य आरोपी अटल काशीनाथ यादव यांच्या बाबत कुठलीही माहिती नव्हती तो बिहार राज्यातील असल्याची माहिती होती. अशावेळी मुख्य आरोपीपर्यंत जाणे आमच्या समोर खुप आवाहन होते. मात्र पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली मी व स्थागुशाचे एस एम जाधव यांचे सहकारी कर्मचारी एपीआय अतुल मोहनकर, पिएसआय शब्बीर पठाण, सुनिल पवार, प्रशांत राजगुरु, राजेश राठोड, पोकॉ डिगू मोरे, अविनाश वाढे, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयीन कर्मचारी, वाशिम पोस्टेचे डीबीचे एपीआय खंडारे व त्याचे सहकारी यांनी तपास केला.



### शेतशिवारातून घेतले ताब्यात

मुख्य आरोपी अटल काशीनाथ यादव याला त्याच्या मामाच्या गाव धवई येथुन शेत शिवारातून ताब्यात घेतले. सदर त्याच्याकडे दोन देशी कट्टे आढळुन आल्याने त्याला त्वरीत बिहार येथील सुर्यपुर पोस्टेला ताब्यात दिले त्यावर तेथे गुन्हा दाखल झाला कारवाई नंतर त्याला वाशिम जिल्हा सत्र न्यायालय वाशिम यांचे कडुन यादव यांचा पौडक्शन वारंट घेऊन विक्रमगंज कारागृहातून ताब्यात घेतले असून त्याची रवानगी पोलिस कोठडीत केली आहे.